श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना
पदावरुन तात्पुरते दुर करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/६५९/२०२५
अहिल्यानगर दिनांक /०७/२०२५ २५/०८/२०२५

वाचा:- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा(शिस्त व अपील)नियम १९६४ मधील नियम ३
२. चौकशी समितीकडील चौकशी अहवाल दिनांक १६/०५/२०२५
३. इकडील वसुलीची नाटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/६५५/२०२५ दिनांक ०२/०७/२०२५

ज्या अर्थी श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, हे आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, येथे कार्यरत असताना त्यांना नेमुण दिलेल कामकाजात अक्षम्य हलगर्जिपणा केलेने आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडी, मवेशी व ब्राम्हणवाडा ता अकोले तसेच पंचायत समिती अकोले येथे मोठया प्रमाणात अपहार झालेला आहे. सदरच्या अपहारास श्री घुले हे जबाबदार असलेचे निदर्शनास आलेले आहे. सदर बाब ही कार्यालयीन शिस्तीचे उल्लघंन करणारी आहे. श्री. घुले हे जिल्हा परिषद कर्मचारी असुन त्यांनी सदैव निरपवाद, सचोटीने व कर्तव्य परायण असणे आवश्यक आहे. तथापि कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग झालेला आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ३ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतुन निलंबीत करीत आहे.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश आमलात राहील तेवढया श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांचे मुख्यालय ................ पंचायत समिती संगमनेर ................ येथे राहिल.

आणि श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांना ....... गटविकास अधिकारी, पं.स. संगमनेर ....... यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल तसेच ते निलबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

निलंबनाचे कालावधीत निलबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी सादर करावे.

..२

निलंबानाचे कालावधीत श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गटविकास अधिकारी पं.स. संगमनेर हे करतील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202508250401ं45 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 22-08-2025 14:07:09
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

श्री. संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

**द्वारा व प्रत**:- जिल्हा आरोग्य अधिकारी, अहिल्यानगर

प्रत:-**मुख्य** लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- गटविकास अधिकारी, पं.स. संगमनेर

प्रत:- निवड नस्ती